## निशाणी ८८ खाली आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.५ यांनी दाखल केला आहे. त्यांचे थोडक्यात कथन असे आहे की, दिनांक १२.०९.२०२५ रोजी प्रतिवादी खाजगी कामानिमित्त पुणे येथे गेले होते, त्यामुळे न्यायालयात गैरहजर होते. वादीने नि. ८७ वर प्रतिवादी क्र.५ यांचे नि. ८१ वरील सरतपासाचे शपथपत्र बंद करण्याबाबत अर्ज दाखल केला. न्यायालयाने दिनांक ०४.१०.२०२५ रोजी प्रतिवादी क्र.५ चा पुरावा बंद आदेश पारीत केला आहे. प्रतिवादी क्र.५ उलटतपासास तयार आहे. प्रतिवादींना दाव्यात यश येण्याची पुर्ण खात्री आहे. प्रतिवादींविरुद्ध दिनांक ०४.१०.२०२५ पुरावा बंदचा आदेश रद्द न केल्यास, प्रतिवादींचे अपरिमीत नुकसान होणार आहे. तरी, दिनांक ०४.१०.२०२५ रोजीचा आदेश रद्द करण्यात यावा.

०२. वादीने आक्षेप नोंदविला की, प्रतिवादी क्र.५ यांनी दिनांक १२.०३.२०२५ रोजी सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले. पुढे दिनांक २५.०३, ११.०४, १७.०४, ११.०७, ०१.०८, ०५.०८, २२.०८, १२.०९ व ०४.१०.२०२५ तारखांना प्रतिवादी क्र.५ हजर राहिले नाहीत. रोजनामा देखील वकील व सामनेवाला गैरहजर असल्याचे दर्शवितो. प्रतिवादी यांना खरंच उलटतपासाला सामोरे जाण्याचे असल्यास गैरहजर राहिले नसते अगर वकिलांनी तरी तसा अर्ज दिला असता. अशा परिस्थितीमध्ये, वादीने दिनांक १२.०९.२०२५ रोजी नि. ८७ वर प्रतिवादींचा पुरावा बंद करण्याकरिता अर्ज दिला. सदर अर्जावर दिनांक ०४.१०.२०२५ रोजी आदेश पारीत झाला आहे. त्यामुळे, प्रतिवादी क्र.५ यांचे अर्जातील कथन खोटे आहे. तरी, अर्ज रु.५,०००/- खर्चासह नामंजुर करण्यात यावा.

०३. युक्तिवाद ऐकला. रोजनामा पाहता, वादीने दाखल केलेल्या म्हणण्याला पुष्टी देणारा आहे. प्रतिवादी यांनी दिनांक १२.०३.२०२५ रोजी

सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले. प्रतिवादी क्र.५ ने दिनांक १२.०३.२०२५ रोजी नि.८१ वर शपथपत्र दाखल केले. त्यानंतर प्रतिवादी क्र.५ व त्यांचे वकील सलग ९ ते १० तारखांना गैरहजर असल्याचे दिसून येते. त्यामुळे अर्जामध्ये नमूद केले की, केवळ दिनांक १२.०९.२०२५ रोजी पुणे येथे असल्याने, प्रतिवादी गैरहजर होते व त्यांचा पुरावा बंद करण्यात आला, ही बाब मान्य करता येणार नाही. अभिलेखावरुन दिसून येते की, प्रतिवादी क्र.५ यांना पुरेसी संधी देण्यात आली, प्रतिवादी क्र.५ सतत गैरहजर राहिले, त्यामुळे त्यांचे विरुद्ध वादीच्या अर्जानुसार पुरावा बंदचा आदेश पारीत झाला आहे. अर्थातच, प्रस्तुतचा दावा गुणदोषावर निकाली होण्याकरिता प्रतिवादी क्र.५ यांना संधी देणे योग्य व न्यायोचीत होईल, उशिराबाबत वादीच्या हक्कात खर्च मंजुर करण्यात येईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे:

**आदेश**

०१. अर्ज रुपये १,०००/- खर्चासह खालील अटीनुसार मंजुर करण्यात येत आहे.

०२. प्रतिवादी क्र.४ यांनी आज अगर पुढील तारखेस खर्चाची रक्कम वादीला द्यावी व पुढील तारखेस उलटतपासाला न चुकता हजर रहावे.

PRAMOD BHAGWAN LOKHANDE
Digitally signed by PRAMOD BHAGWAN LOKHANDE
Date: 2025.11.15 17:14:58 +0530

दिनांकः- १५.११.२०२५

(प्र. भ. लोखंडे)
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, बार्शी.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Order / Judgment are same word to word, as per the original Order / Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : Shripad N. Chilka, Steno Grade-2. |
| Court | : Civil Court Senior Division, Barshi. |
| Judgment/Order signed by the P. O. On | : 15.11.2025 |
| Judgment / Order uploaded on | : 15.11.2025 |